INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# महादजी शिंदे यांचे 'वकिल-ए-मुतालिक' म्हणून कार्य
# (Mahadji Shinde's work as a Lawyer A Mutalik)

**प्रा.डॉ. के. डी. सावंत**

इतिहास विभाग प्रमुख
महिला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड.
E-mail: kailassawant09@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/07.2022-94943781/IRJHIS2207026**

**प्रस्तावना :**

"इतिहास हे एक शास्त्र आहे व ते साधनांच्या आधारे सखोल व चिकित्सकपणे अभ्यासावे लागते" असे इ.एच कार यांनी म्हटले आहे [१]. इतिहास घडविण्यासाठी व्यक्तीला प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढून इतिहासावर आपला ठसा उमटविण्याचे कार्य महादजी शिंदे यांनी यथार्थपणे कसे केले त्याचा शोध या संशोधन पेपरमधून घेतला आहे.

कार्लाइलने म्हटल्याप्रमाणे "महापुरूषांचे चरित्र म्हणजे इतिहास होय.[२]" इतिहासाच्या शास्त्रीय अभ्यासामध्ये महापुरूषांच्या चरित्र व कार्यास विशेष महत्व असते. कारण इतिहास अशा महापुरूषांच्या कर्तृत्वशाली योगदानामुळे समृद्ध बनत असतो. असा इतिहास घडवितांना आपल्या मुत्सदीपणाने आणि ध्येयवादाने नवी मांडणी करतात व ते कालचक्रावर स्वतःचा ठसा उमटवितात. अशाच महापुरूषांच्या यादीत महादजी शिंदे यांचे नाव आग्रक्रमाने येते. महादजी शिंदे हे मध्ययुगांतील मराठयांच्या इतिहासात आपल्या तेजस्वी कर्तृत्वाने कलाटणी देणारे महापुरूष होते. या महापुरूषांचा उदय आणि विकास अभ्यासतांना महाराष्ट्रातील संत परंपरा, मराठ्यांच्या पराक्रमाची कहाणी तसेच छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते पेशवा बाजीराव पहिल्यापर्यंत इतिहासाची पार्श्वभूमी अभ्यासावी लागते. अशी पार्श्वभूमी लक्षात घेतली असता, मध्ययुगीन अंधःकाराच्या नभांगणात महादजी शिंदे यांचा तेजस्वी तारा कसा चमकून दिसतो, हे लक्षात येऊ शकते. किन एच.जी. महादजी शिंदे विषयी म्हणतात की, "Amongst Asiatic public men, at least there is no other name that can be fairs matched with that of Madhadiji Sindha and even to these he was superior alike in The scale of this success and in the qualities of his head and heart."[3]

"मराठयांच्या आस्मितेला छत्रपती शिवाजी महाराजांनी जागृत केले आणि स्वधर्म, स्वसंस्कृती यावरील निष्ठेने प्रेरित होवून मराठयांनी भारतीय जनतेला तुर्क, मोगलव्याप्त इतिहासाची चार शतके विसरायला लावून भारतीयांचा आत्मविश्वास जागृत केला. ही महनीय कामगिरी महाराष्ट्रालाच काय संपूर्ण देशाला सदैव स्फूर्ती देत राहिल, यात शंका नाही."[४]

मध्ययुगीन परिस्थिती प्रतिकूल असून ही मराठयांनी भारतीय स्वातंत्र्य लढयात अत्यंत मोलाचे योगदान दिले. कोल्हापूर येथील रणरागिणी ताराबाई, संताजी घोरपडे, धनाजी जाधव यांनी मराठयांचे स्वातंत्र्य युद्ध चालविले.[५]

पेशवा बाजीराव पहिला यांच्या काळात (इ.स. १७२०-१७४०) या कालखंडात त्यांनी सबंध उत्तर भारतामध्ये मराठी सत्तेचा विस्तार केला. बडोदा, धार, इंदोर व ग्वाल्हेर येथे मराठी सत्तेचा विस्तार घडून आणला. या बृहन्महाराष्ट्रास 'मराठा मंडळ' असे म्हटले जाते. बाजीरावने उत्तर भारतात मराठी सत्तेचे वर्चस्व व दक्षिणेत प्रभूत्य प्रस्थापित केले.

प्रा. ग.ह. खरे यांच्यामते "महादजी शिंदे हा १७८१ नंतर परत उत्तरेकडे मराठयांची प्रतिष्ठा वाढवित होता. इ.स. १७७५ ते इ.स. १८०० पर्यंतचा मराठयांचा इतिहास म्हणजे शिंदे यांच्या कर्तुत्वाची गाथा होय"[६]

अशा या मराठयांच्या इतिहासात महादजी शिंदे यांचे कार्य मोठे आहे. त्यांचा जन्म इ.स. १७२७ ला झाला. त्यांची राजकीय कारकीर्द ही इ.स. १७६१ ते इ.स. १७९४ पर्यंत असलेली दिसते. त्यांनी दिल्लीच्या मोगल सत्तेवर अंकुश ठेवला होता. त्यांनी मोगलांच्या केंद्र सत्तेवर सार्वभौम मराठी सत्तेचा प्रभाव निश्चित केला. त्यामुळेच त्यांना, "इ.स. १७८४ मध्ये मोगल बादशहा शहाआलम याने 'वकिल-ए-मुतालिक' हे अत्यंत महत्वाचे पद दिले"[७] व ते महादजी शिंदे यांनी अत्यंत निष्ठेपूर्वक पेशव्यास देवून त्यांच्या वतीने बादशाहीचा कारभार पाहिला.

स्वामिनीष्ठा हा महादजी शिंदे यांचा एक मोठा गुण. याचा आकल उल्लेख करावा लागेल. शिंदे घराण्यावर पेशव्यांनी केलेल्या उपकाराची जाणीव त्यांनी सतत मनी बाळगली होती. छत्रपती शिवाजी महाराज, थोरले बाजीराव यांच्या धोरणाचा पाठपुरावा करणारा सुभेदार महादजी शिंदे हा शेवटचा मराठेशाहीचा अध्वर्य होता."[८]

**विषयाचे महत्व :**

इतिहास संशोधनाचा मूळ उद्देश म्हणजे जुन्या संकल्पना, जूनी संस्कृती, जूने विचार व तत्कालीन परिस्थिती यांचा अभ्यास करून त्यावर पुनर्विचार करून त्यांच्या योग्य - योग्यतेचा परामर्श घेणे. त्यामध्ये होवून गेलेला थोर व्यक्तीच्या कार्य कर्तुत्वाचा आढावा घेवून त्याची प्रेरणा भावी पिढीस घेता यावी. या थोर व्यक्तिनी केलेले कार्य हे आदर्श म्हणून समाजासमोर यावे. थोरांच्या चरित्रापासून मिळणारी शिकवण आणि प्रेरणा ही बहुमोल असते. स्वधर्माभिमानी, राजनितीक कुशल, पराक्रमी, दुरदर्शी व मुत्सदी अशा ज्या काही थोर व्यक्ती भारतात निर्माण झाल्या त्यात महादजी शिंदे यांची खास गणना होते.

मराठयांच्या इतिहासातील महादजी शिंदे यांनी वकिल-ए-मुतालिक म्हणून केलेल्या कामगिरीवर प्रकाश टाकणे हा या संशोधन पेपरचा उद्देश आहे.

महादजी शिंदे यांनी जमाविलेल्या साधनसामुग्री, फौज, जहागिरी त्यांनी निर्माण केलेला दबदबा, त्यांनी मिळविलेली लोकप्रियता यामुळे शिंदे घराण्याची प्रतिष्ठा वाढलीच पण त्याचबरोबर मराठा साम्राज्याची प्रतिष्ठा वाढली. यासाठी महादजी शिंदे यांना जी खडतर वाटचाल करावी लागली ती समाजासमोर आणण्याच्या दृष्टीने प्रस्तुत अभ्यासाची निवड केली आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीची निवड केली आहे.

**विषयाची व्याप्ती :**

महादजी शिंदे यांचे व्यक्तिमत्व अनेक कार्यानी ओतपोत भरलेले आहे. परंतु सुक्ष्मपणे अभ्यास करण्याच्या उद्देशाने महादजी शिंदे यांचे 'वकिल-ए-मुतालिक' कार्यापुरती व्याप्ती मर्यादित राहिल.

**संशोधन उदिष्टे :**

१) महादजी शिंदे यांच्या चरित्राचा संक्षेपाने आढावा घेणे.

२) मराठयांच्या इतिहासातील महादजी शिंदे यांच्या योगदानाची चर्चा करणे.

३) 'वकिल-ए-मुतालिक' म्हणून महादजी शिंदे यांच्या कार्याचा अभ्यास करणे.

**गृहितके :**

१) महादजी शिंदे यांचे चरित्र प्रेरणादायी राहिले.

२) मराठयांच्या इतिहासातील महादजी शिंदे यांचे योगदान महत्वाचे राहिले

३) 'वकिल-ए-मुतालिक' या सर्वोच्च पदवीमुळे महादजी शिंदे यांचे मराठा सतेतील श्रेष्ठत्व सिद्ध झाले.

**महादजी शिंदे यांचे चरित्र :**

सातारा जिल्हयात कोरेगाव तालुक्यातील कन्हेरखेड हे शिंद्याचे मूळ गाव होय. या गावी हे घराणे पाटिलकी करीत होते. याच घराण्यातील मुलगी छत्रपती शाहूस दिलेली होती.[९] याच घराण्यातील राणोजी शिंदे या कर्तृत्ववान पुरुषाने अठराव्या शतकाच्या पुर्वर्धात पहिल्या बाजीराव पेशव्याच्या नेतृत्वाखाली मराठयांच्या राज्याच्या विस्तारात फार महत्वाची कामगिरी बजावलेली होती. राणोजी शिंदे यास दोन बायका होत्या. एक निंबाबाई ऊर्फ मैनाबाई व दुसरी खंडाराणी चिमाबाई.[१०] निंबाबाईना जयप्पा, ज्योतिबा व दत्ताजी असे तीन तर खंडाराणीस तुकोजी आणि महादजी असे दोन पुत्र होते. पैकी जयप्पाचा इ.स.१७५५ मध्ये नागोरास खून झाला. दत्ताजी दिल्लीनजीक इ.स १७६० मध्ये लढाईत मारला गेला. ज्योतिबा इ. स. १७६० मध्ये कुंभेरीस मृत्यु पावला. तुकोजी इ.स. १७६१ च्या पानिपत युद्धात ठार झाला.[११] महादजी शिंदेचा जन्मकाळ निश्चित नाही. परंतु इतिहासकार महादजी शिंदे यांचा जन्मकाळ इ.स. १७२७ हे प्रमाण मानतात.[१२] महादजी शिंदेचे सर्वच बंधू शूर व पराक्रमी असल्यामुळे आणि महादजी शिंदे सर्वात धाकटा असल्याने इ.स. १७६० पर्यंतच्या कागदपत्रात महादजी शिंदेविषयी स्पष्ट उल्लेख सापडत नाहीत. तथापि इ.स. १७५७ च्या मोहिमेपासून ते जबाबदारीने काम करीत होते यात संशय नाही.

**महादजी शिंदे यांचे मराठयांच्या इतिहासातील योगदान :**

महादजी शिंदे यांचे योगदान मराठ्यांच्या इतिहासात महत्वाचे राहिल्याचे दिसते. महादजी शिंदे यांची पानिपत युद्धातील भूमिका, मंगरोळ - भाटवाडाचे युद्ध दि. २३ ते ३० नोव्हेंबर १७६१, आजमेरचा संग्राम इ.स. १७६२, राक्षसभुवनचे युद्ध दि. १० ऑगस्ट १७६३, तोतयाचा गोंधळ इ.स. १७६३ महादजी शिंदे यांना सरदारकीची प्राप्ती दि. १५ जानेवारी १७६७, घोडयांचा संग्राम इ.स. १७६८ मेवाड वारसा प्रकरण - इ.स. १७६७-१७६८, महादजी शिंदे यांचे उतरेकडील राजकारण इ.स. १७६९ ते १७७२ मराठयांचा दिल्लीवर ताबा, महादजी शिंदे यांनी मुगल बादशहास दिल्लीस आणले. इ.स. ६ जानेवारी १७७२, महादजी शिंदे आणि बाराभाई कारस्थान, महादजी शिंदे यांची कोल्हापूर मोहिम इ.स. १७७७, मोरोबा दादांची बंडखोरी व महादजी शिंदे यांचा त्यास शह दि. ११ जुलै १७७८, महादजी शिंदे व इंग्रज संघर्ष तळेगाव व वडगावचे युद्ध. महादजी शिंदे यांचा उत्कृर्ष, इंग्रज विरोधी राजकारण व चौकडीचा संघ दि ९ ऑगस्ट १७८०, इंग्रजाशी धावपळीचे युद्ध इ. स.१७८०, इंग्रजांची माघार, सालबाईचा तह इ.स. १७८२, इ. स. १७६१ ते इ.स. १७८४ पर्यंत महादजी शिंदे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मराठयांच्या इतिहासामध्ये आपले योगदान दिल्याचे दिसते.

**महादजी शिंदे यांचे 'वकिल - ए - मुतालिक' म्हणून कार्य :**

महादजी शिंदे यांची 'मीरबक्षी' व 'वकिल-ए-मुतालिक' पदावर नियुक्ती दि. ३ डिसेंबर १७८४ रोजी मोगल बादशहा शाहआलम यांनी केली.[१३] वकिल-ए-मुतालिक, हे अत्यंत महत्वाचे पद होते. आतापर्यंत हे फक्त निजाम-उल-मुल्क यानांच मिळाले होते. वझीर आणि मीरबक्षी (सेनापती) या दोघांचे अधिकार या 'वकिल-ए-मुतालिक' ला देण्यात आले होते. महादजी शिंदे यांनी ही नम्रपणे हे पद पेशव्यांस अर्पण करावे आणि त्याचा मुतालिक म्हणून आपण काम पाहू असे सांगितल्याची दिसते. पण बातशहाने मात्र सर्व पदे व मरातब प्रथम पेशव्यास देऊन पेशव्यांच्या मार्फत ही आपण ती महादजी शिंदेलाच देत आहोत, असा स्पष्ट फारसी हुकूम लिहिलेला दिसतो. सरदेसाई गो.स. लिहितात, "असा हा फरक खुद्द मोगल बादशहाने आपण होऊन केला की महादजी शिंदे यांनी तो अंतस्थपणे मोगल बादशहाकडून करविला,[१४] हे समजणे कठीण आहे. शिवाय फारसी भाषेच्या नकला करणारे व तर्जुमा करणारे यांच्या समजण्यातही फेर असेल." मात्र या संबंधाने नाना फडणीस व महादजी शिंदे यांच्यात पुढील दोन वर्ष संघर्षात वाढ झाली. स्पष्ट पुरावा नसल्याने या वादात शब्दापलीकडे काही ही महत्व नाही. महादजी शिंदे यांनी अंगावर घेतलेली जबाबदारी मोठी होती. महादजी शिंदे यांनी प्रारंभी पैसा उभा करण्यासाठी जहागिरीच्या कागदपत्राची छाननी सुरु केली. तसेच राजपूत राजेरजवाडे यांच्याकडे वर्षानुवर्ष थकलेल्या बादशाही खंडणीची मागणी केली. महादजी शिंदे यांनी जहागिरीची चौकशी सुरु केली हे योग्यच होते. मोगल बादशहा आपल्या लष्करी आणि दिवाणी अधिकाऱ्यांना खर्चाकरिता कामावर असेपर्यंत सबंध सुभ्याचा किंवा त्याचा लहान विभागाचा वसूल लावून देत त्याला मनसब म्हणत. मोगल राज्यकार्त्यांना सरंजामी उमरावांचा शिरजोर वर्ग निर्माण करावयाचा नव्हता. म्हणून अधिकाऱ्यांच्या मृत्युनंतर त्याची मनसब जप्त होई. पण बादशाहीच्या पडत्या काळात या मनसबीना कायम जहागिरीचे स्वरूप प्राप्त झाले. एकदा मिळालेली मनसब तो अधिकारी व त्याचे वंशज कायमची बळकावून बसले.

बादशहाच्या ताब्यातील दोन सुभ्यांतून पुरेसा वसूल जमा करावयाचा आणि त्याच्या जोरावर नव्या निष्ठावान लष्कराचा खर्च भागवावयाचा तर या उपरसुंभ उमरावांना हटविणे भाग होते. सहाजिकच हे मुसलमान उमराव या नव्या रीजेंट विरुद्ध दंड थोपटून उभे राहिले. जयपुर, जोधपूर, उदयपूर इत्यादी राजपूत घराण्यांनी मराठयांच्या कधी न संपणाऱ्या चौथ सरदेशमुखीच्या मागण्यांनी त्रासून गेली होती. मराठयांबद्दल त्यांना तिरस्कार वाटे. बादशहाची थकलेली खंडणी नव्या रीजंटकडे भरून मराठयांचे हात बळकट करण्याची त्यांची मुळीच इच्छा नव्हती. इंग्रज दरमहाचा तनखा नियमितपणे देत नाहीत आणि दिल्लीस पण घेऊन जात नाहीत. म्हणून बादशहा इंग्रजाशी भांडला आणि मराठ्यांच्याकडे आश्रयास आल्याचे दिसते. बादशहाची अपेक्षा होती महादजी शिंदे यांनी आपल्या कुटुंबाच्या निर्वाहा करिता आणि आपल्या इतमामाकरिता नियमीतपणे पुरेसी रक्कम द्यावी. महादजी शिंदे पेशवे सरकारच्या म्हणजे पर्यायाने आपल्या तंत्राने जोपर्यंत वागत नाही तोपर्यंत त्यांना साह्य करण्यास नाना फडणीस तयार नव्हते.

पश्चिमेकडून पंजाबमधून शीखांच्या टोळया बादशाही दिल्ली सुभ्यात घुसत लुटमार करून गावे बेचिराख करून परत जात. त्यांच्या पुढाऱ्यांशी झालेल्या करारनाम्यांना ते जुमानीत नसत.

या सर्व अडचणीवर मात करण्यासाठी महादजी शिंदेपुढे एकच मार्ग होता तो म्हणजे विरोधकांचा समाचार घेऊन त्यांचा निकाल लावणे. महादजी शिंदे यांनी या समस्येवर मात करण्यासाठी नवीन आधुनिक पद्धतीचे कवायती लष्कर उभारणी करण्याचे ठरविले. डी. बॉईन यास एक सबंध कंपू (ब्रिगेड दहा हजार सैनिक) तयार करण्यास सांगितले. दोन-तीन वर्षात या कंपूची संख्या तीन वर गेली. शिपायांचे पगार वेळेवर व्हावे म्हणून अंतर्वेदीत पंधरा लाखाची जहागीर ही डी. बॉईनला याला देण्यात आली. या सैन्यास लागणारी शस्त्रास्त्रे तयार करण्याचे कारखाने आग्रा, आलिगड, ढावारी येथे उघडण्यात आले. महादजी शिंदे यांनी केलेला प्रयोग अल्पायुषी ठरला. मराठी घोडदळात पूर्वीच्या जोम राहिला नाही. डी. बॉईनच्या नंतर इंग्रज फौजांनी महादजी शिंदे यांच्या कवायती फौजेच्या अधिकाऱ्यांना फोडले आणि असई आग्रा, लासवारी, अलीगड येथे महादजी शिंदे यांच्या कवायती फौजा लढल्या पण कुशल सेनानीच्या अभावी त्यांचा पराक्रम वाया गेला.

इ. स. १७८७ मध्ये राजपूत राजांवर खंडणीची बाकी वसूल करण्याकरिता मराठी सैन्य जयपूरच्या दिशेने चाल करून गेले. त्यांच्या बरोबर असलेल्या मोगल सैन्याने फितूर करून आयत्या वेळी ते शत्रूस मिळाले. लालसोट (२८ जुलै १७८७) येथे मराठ्यांचे दुसरे पानिपतच व्हावयाचे पण डी. बॉईनच्या पायदळाने शत्रूस थोपवून धरले आणि मराठी सैन्यांनी यशस्वी माघार घेतली. तोफा आणि इतर जड सामान भरतपूरच्या किल्ल्यात पोहोचवले. उत्तरेतून, पूर्वेकडून, दक्षिणेतून जादा सैन्य येण्याची महादजी शिंदे वाट पाहत बसले. इकडे इस्माईल बेग आणि रोहिला गुलाम कादर याने दिल्ली काबीज करून पैशाकरिता बादशाही कुटुंबाचा अमानुष्य छळ केला. गुलाम कादर अत्यंत क्रूर कर्म नीच कृतीचा, राजघराण्यातील बायका, मुलांचा नानापरी छळ करुन त्याचे समाधान होईना तेंव्हा बादशहाचे आपल्या खंजिराने त्याने डोळेच काढले. महादजी शिंदे यांचे सैन्य दिल्लीभोवती जमा होतात असे पाहून गुलामाने किल्यातून पळ काढला, पण मराठी सैन्याने त्याचा पाठलाग करून त्यास गाठले व त्याला ठार मारले. दि. ३१ डिसेंबर १७८७ रोजी महादजी शिंदे यांनी बादशहाची भेट घेतली आणि त्याला दिलासा दिला.

इस्माईल बेग आणि राजपूत राजांची युती झाली. तीस हजार पायदळ आणि सतरा हजार राजपूत स्वार यांनी जयपूरच्या उत्तरेस पाटण येथे खंदक खणून छावणी उभारली. डी. बॉईनच्या तोफांनी खंदक आड बसलेल्या शत्रूस बाहेर काढले आणि त्याच्या पायदळाची बंदुकाच्या फैरीने हैराण केले. तोफा, निशाणे, तंबू गाडया सर्व सामान टाकून शत्रू सैन्याने पोबारा केला. इस्माइल बेगच्या मोगल लष्कराचा संपूर्ण नाश झाला आणि जयपूरकरांचा विरोध संपला.

१० सप्टेंबर १७९० रोजी मेडताच्या लढाईत जोधपूर करांना हरवीण्यात आले. अजमेरचा किल्ला सांभर आणि भोवतालचा प्रदेश मराठयांच्या ताब्यात आला. महादजी शिंदे यांच्या उष्करी तयारीमुळे शीख टोळयांचे आक्रमण आपोआप बंद पडले. सतलजपासून नर्मदेपर्यंत मराठी अमंल सुरु झाला. महादजी शिंदे आणि त्यांच्या बरोबर मराठयांचा दरारा हिंदुस्थानात वाढला.

१२ जानेवारी १७९२ रोजी महादजी शिंदे पुण्याला आले. तेथे आठरा महिने राहिले. या आठरा महिन्यात मराठयांत निर्माण झालेली दुही कमी करून पेशव्यांना सर्वांनी सहकार्य करावे असे ठरले. दि. १२ फेब्रुवारी १७९४ रोजी अल्पशा आजाराने महादजी शिंदे यांचा मृत्यु

झाला.[१५]

**सारांश :**

मध्ययुगीन भारताच्या पटलावर विभागलेल्या आणि दुर्बल झालेल्या मोगल सतेचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचे आव्हान महादजी शिंदे यांनी स्वीकारले आणि त्यांनी मराठी सत्तेचे वैभव पुन: प्रस्थापित केले.

महादजी शिंदे यांनी केवळ मराठयांच्या इतिहासामध्येच नव्हे तर समग्र भारताच्या इतिहासामध्ये अतुलनीय अशी कामगिरी बजावली. तत्कालीन परिस्थितीला आकार देऊन त्यांनी मराठी सत्तेच्या वैभवाची ध्वजा उंच उंच फडकविली. 'वकिल-ए-मुतालिक' या पंतप्रधानपदी पोहोचेपर्यंत कामगिरी केली. वाटचाल आणि या श्रेष्ठ यशशिखरावर पोहोचल्यानंतर त्यांनी बजावलेली कामगिरी पाहता त्यांच्या कर्तृत्वाच्या अनेक छटा प्रकाशमान होतात. त्याव्दारे महादजी शिंदे यांचे राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक अशा अनेक पैलुंनी कर्तुत्व सिद्ध होते.

**संदर्भ सूची :**

१) कार ई.एच., व्हॉट इज हिस्टरी, (अनु), लेले गो.गो, मॅकमिलन अँण्ड कंपनी प्रकाशन, लंडन, १९५५, पृष्ठ १९

२) गायकवाड, सरदेसाई, हानमाने, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१, पृष्ठ ३

3) Keen H.G., Ruler's of India, Edi Hunter w.w. oxford at the clerendon Press, London, 1891, P. 191

४) खोबरेकर वि.गो. मराठयांचा इतिहास, पृष्ठ ८७.

५) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड-१, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृष्ठ १९

६) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., मराठयांचा इतिहास, खंड-३, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६, पृष्ठ ५६.

७) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., मराठयांचा इतिहास, उपरोक्त, पृष्ठ ७४

८) किता, पृष्ठ ५९

९) सुरजामे जगन्नाथ, प्रभाकर शिंदे, अलिजाब बाहदुर, यांच्या घराण्याचा इतिहास, १८७२, पृष्ठ ६

१०) नरहर राजाध्यक्ष जिवबदादा यांचे चरित्र, पृष्ठ ४४

११) तारकुंडे सीताराम, क्षत्रीय घराण्याचा इतिहास, १९३१, पृष्ठ ४०

१२) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड-५, पृष्ठ २११

१३) सरकार जदुनाथ (अनु), विव्दास स. भ., मोगल साम्राज्याचा ऱ्हास, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ, मुंभई, १९८१, पृष्ठ १९२

१४) सरदेसाई गो. स., मराठी रियासत, भात १९९१, पृष्ठ ६

१५) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., मराठयांचा इतिहास, खंड-३, उपरोक्त, पृष्ठ ५०५